महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

क्र. मासंवि/रवका/न.क्र. १सी/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : agmhrom@gmail.com
Website : www.mahadiscom.in

## सुधारपत्र क्रमांक ८७ दिनांक ०९ / ०८ / २०२१

**(म.रा.वि.वि.कं.मर्या., वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम-२००५)**

**विषय:- दिव्यांग अधिनियम २०१६ अनुसार सरळसेवेतील वेतनगट १ ते ४ पदांवर शारीरिकदृष्टया दिव्यांग कर्मचाऱ्यांकरीता ४ टक्के आरक्षण व वेतनगट - १ व २ मधील पदांवर पदोन्नती मधील आरक्षण विहित करणेबाबत.**

**संदर्भ:-** १) महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ दि. २९.०५.२०१९.
२) महाराष्ट्र शासन पत्र क्र. दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६-अ दि. १४.०७.२०२१.

केंद्र शासनाने दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६ पारित केला असून त्यानंतर अपंग व्यक्ती (समान संधी संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ व्यपगत झाला आहे. दिनांक १५.०६.२०१७ रोजीच्या अधिसूचनेव्दारे दिव्यांग व्यक्तीचे अधिकार अधिनियम, २०१६ अंमलात आणलेला आहे.

२. केंद्र शासनाने दि. १५.०१.२०१८ च्या कार्यालयीन आदेशान्वये दिव्यांगाच्या (१) अंध/अल्पदृष्टी (२) कर्णबधीरता अथवा ऐकूयेण्यातील दुर्बलता (३) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy)/ कुष्ठरोग मुक्त (Leprosy cured) शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism)/ आम्ल हल्लाग्रस्त (Acid attack victims)/ स्नायु विकृती (Muscular dystrophy) (४) स्वमग्नता (Autism)/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disabiliy)/ विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific learning disability)/ मानसिक आजार (Mental illness) (५) वरील १ त ४ मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणारे अशा विविध ५ प्रकारांसाठी ४% आरक्षण विहित केलेले आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६अ दि. २९.०५.२०१९ अन्वये सदरचे आरक्षण अंगीकृत केलेले आहे.

३. आता, संचालक मंडळ यांनी ठराव क्र. १८३९ दि. ०३.०८.२०१९ व प्रशासकीय परिपत्रक क्र. ६२० दि. १८.०२.२०२१ अन्वये कंपनीमध्ये सरळसेवा प्रवेशासाठी उपरोक्त पाच गटांपैकी दिव्यांगत्व असणाऱ्या संवर्गाकरीता महाराष्ट्र शासनाच्या धर्तीवर ४% पदे आरक्षित ठेवण्याकरीता मंजुरी प्रदान केलेली आहे. त्याच प्रमाणे महाराष्ट्र शासन पत्र क्र. दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६-अ दि. १४.०७.२०२१ ला अनुसरून मंडळ ठराव क्र. २३७० दि. ०५.०८.२०२१ व प्रशासकीय परिपत्रक क्र. ६२९ दि. ०९.०८.२०२१ अन्वये कंपनीमध्ये वेतनगट - १ आणि वेतनगट - २ या संवर्गातील पदांकरीता पदोन्नतीसाठी शासनाच्या धर्तीवर ४% पदे राखीव ठेवण्याकरीता मंजुरी प्रदान केलेली आहे.

४. या अनुषंगाने म.रा.वि.वि.कं.मर्या., वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम - २००५ शी संलग्न **परिशिष्ट 'ठ'(Appendix J)** मधील यापूर्वीच्या तरतूदी रद्दबातल करून सोबत जोडण्यात आलेल्या **जोडपत्र -'अ'** नुसार दिव्यांग कर्मचाऱ्यांकरीता सरळसेवा भरती व पदोन्नती करीता सुधारीत आरक्षण अंमलबजावणी करण्यातबाबतची कार्यपध्दती राहील.

५. सदर सुधारपत्र कंपनीच्या Employee Portal/ e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत :** १) जोडपत्र - 'अ'
२) प्रपत्र - 'अ' व 'ब'
३) महाराष्ट्र शासनचा शासन निर्णय दि. २९.०५.२०१९.
४) महाराष्ट्र शासनचा शासन निर्णय दि. १४.०७.२०२१.

**(अ.म. भादीकर)**
**कार्यकारी संचालक (मासं)**

# परिशिष्ट - 'ठ'

## दिव्यांग अधिनियम २०१६ अनुसार शासन संवेतील पदांवर शारीरिकदृष्टया दिव्यांग व्यक्तींसाठी ४ टक्के आरक्षणाबाबतच्या तरतुदी

१. दिव्यांग अधिनियम २०१६ मधील तरतुदींनुसार विहित प्रमाणात दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तींना पद आणि सेवेमध्ये आरक्षणासंदर्भात कलम २(r) मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे, दिव्यांग व्यक्तींसाठी कंपनीच्या सेवेत प्रवेशासाठी दिव्यांगांच्या खाली नमूद करण्यात आलेल्या पाच गटापैकी गट अ, ब, क साठी प्रत्येकी १% तसेच गट ड व इ साठी १% या प्रमाणे ४% आरक्षण विहित करण्यात येत आहे. सरळसेवा भरतीमध्ये विहित दिव्यांगत्व असणाऱ्या सर्व संवर्गांसाठी रिक्त पदाच्या ४% पदे दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित ठेवण्यात यावीत.

| अ.क्र. | गट | अपंगत्व प्रकार | आरक्षणाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अ | अंध/अल्पदृष्टी | १% |
| २ | ब | कर्णबधीरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता | १% |
| ३ | क | अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy)/ कुष्ठरोग मुक्त (Leprosy cured)/ शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism)/ आम्ल हल्लाग्रस्त (Acid attack victims)/ स्नायु विकृती (Muscular dystrophy) | १% |
| ४ | ड | स्वमग्नता (Autism)/ मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disabiliy)/ विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific learning disability)/ मानसिक आजार (Mental illness) | १% |
| ५ | इ | वरील अ त ड मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यांसाठी त्यांच्यासाठी सुनिश्चीत करण्यात आलेल्या पदावर | |

२. **पदांची गणना -** वेतनगट ३ व ४ मधील पदांची गणना करतांना, त्या भरती वर्षातील त्या त्या गटातील सर्व संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या संख्येवर निश्चित करावी. असे करतांना त्या त्या गटातील दिव्यांगासाठी एकाच आस्थापनेतील सुनिश्चित करण्यात आलेल्या संवर्गातील रिक्त पदे व सुनिश्चि करण्यात आलेल्या संवर्गातील रिक्त पदे विचारात घेण्यात यावीत. परंतु जेव्हा सुनिश्चित न करण्यात आलेल्या संवर्गातील पदांची संख्या मोठी राहील अशा वेळी ज्या संवर्गाची पद संख्या व रिक्त पदे कमी आहेत असा संवर्ग आरक्षणाची पदे निश्चित करण्यासाठी विचारात घ्यावा. गट क संवर्गातील तीन विविध पदनाम असलेल्या पदावर पदभरती करावयाची असल्यास त्यातील एक पद अपंगासाठी सुनिश्चित नसल्यास उक्त पदातील रिक्त पदावरील आरक्षणाची ४% पदे अन्य दोन संवर्गात घेण्यात यावीत. उदा: यंत्रचालक, वरीष्ठ यंत्रचालक व प्रधान यंत्रचालक अशी तीन पदावर पद भरती करतांना प्रधान यंत्रचालक पद सुनिश्चित नसल्यास, प्रधान यंत्रचालक या संवर्गाची रिक्त पदांची संख्या अन्य दोन संवर्गापेक्षा मोठी असल्यास उर्वरित दोन संवर्गातील ज्या पदाची संख्या कमी असेल त्या संवर्गाची पदे दिव्यांग आरक्षणाची पदे निश्चित करण्यासाठी विचारात घेण्यात यावी. असे करत असताना विहित आरक्षणाचे प्रमाण ओलांडले जाईल. भरतीसाठी ७ रिक्त पदे उपलब्ध होत असल्यास त्यातील १ पद दिव्यांगासाठी आरक्षित करावे. ७ पेक्षा जास्त पदे भरतीसाठी उपलब्ध होत असल्यास विहित आरक्षणाप्रमाणे पद गणना करावी.

विहीत दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तींसाठी वेतनगट १ व २ च्या सरळसेवेच्या कोटयातील पदांसाठी आरक्षणाची पदे निश्चीत करतांना त्या त्या संवर्गासाठी विहीत केलेल्या प्रमाणात रिक्त पदावर गणना करण्यात यावी.

तसेच एखाद्या संवर्गात / गटात दिव्यांगत्वाच्या सर्व प्रकारांसाठी पदे सुनिश्चीत केली असली किंवा कमी प्रकारांसाठी पदे सुनिश्चीत केली असली तरी जेवढया प्रकारासाठी पदे सुनिश्चीत केली आहेत, त्यासाठीचे एकूण आरक्षण ४% एवढेच (सरळसेवेच्या कोटयातील पदांवर) राहील. कमी प्रकारासाठी पदे सुनिश्चीत केली म्हणून आरक्षणाचे एकूण प्रमाण कमी करण्यात येणार नाही.

३. **पद सुनिश्चितीकरणास अपवाद: -** उपरोक्त तरतुदीनुसार एखाद्या विभागातील पद आरक्षित करणे शक्य होणार नसल्यास याबाबतीत सूट देण्याबाबतच्या तरतुदी दिव्यांग अधिनियमाच्या कलम ३४ मध्ये नमूद केलेल्या आहेत. त्यानुसार एखाद्या संवर्गास त्या पदाच्या कामाचे स्वरुप व जबाबदाऱ्या विचारात घेऊन दिव्यांग व्यक्तीसाठी पद (सुर्निश्चितीकरणातून) आरक्षणातून आस्थापनेवरील सर्व संवर्गासाठी किंवा काही संवर्गासाठी सूट घ्यावयाची असल्यास तसा प्रस्ताव संपूर्ण समर्थनासह शासनाच्या संबंधीत विभागाच्या सहमतीने संयुक्तिक आदेश निर्गमित करण्यात येतील.

४. **अनारक्षित पदांवर दिव्यांग व्यक्तींची नियुक्ती:-** दिव्यांगासाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर दिव्यांग व्यक्तीस गुणवत्तेच्या आधारावर निवडीस पात्र ठरत असल्यास व त्यांचेसाठी पद आरक्षित नसले तरी नियुक्तीसाठी अपात्र ठरविता येणार नाही. जर दिव्यांग उमेदवारांची इतर उमेदवारांप्रमाणेच व प्रचलित नियमाप्रमाणे दिव्यांग उमेदवारांना देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ न घेता एखाद्या पदावर निवड झाली असेल अशा उमेदवारांची गणना दिव्यांगासाठी आरक्षित जागेवर करण्यात येऊ नये व दिव्यांगासाठी आरक्षित पदे / पद इतर दिव्यांग उमेदवारांमधून भरण्यात यावीत.

५. **दिव्यांगाचे प्रमाणपत्र :-** दिव्यांगाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या व्यक्तीने सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. निवड प्रक्रीये दरम्यान अथवा नियुक्तीच्या दरम्यान उक्त प्रमाणपत्राची तपासणी/ फेरतपासणी करण्याचे अधिकार नियुक्ती प्रधिकाऱ्याला राहतील. दिव्यांगांच्या प्रमाणपत्राबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक १४.०९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अनुसार दिव्यांगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

६. **वयोमर्यादा:** - दिव्यांग व्यक्तीसाठी सेवा प्रवेशासाठी कमाल वयोमर्यादा वय वर्षे ४५ इतकीच राहील.

७. **बिंदुनामावली (रोस्टर) राखणे:-** प्रत्येक संवर्गासाठी दिव्यांग व्यक्ती सरळ सेवा भरतीच्या पदासाठी १०० बिंदू नामावलीची स्वतंत्र नोंदवही ठेवावी. यापूर्वी ३% आरक्षणाप्रमाणे दिव्यांग व्यक्तीसाठी बिंदू नामावलीतील बिंदू क्रमांक १, ३४ व ६७ निश्चित करण्यात आले होते. परंतु आता दिव्यांगांच्या ४% वर्गवारी असल्याने बिंदूनामावली राखण्यास सुसूत्रता यावी म्हणून क्रमांक १, २६, ५१ व ७६ बिंदू सरळसेवेकरीता व पदोन्नतीकरीता निश्चित करण्यात येत आहेत.

**वरील बिंदूंची विभागणी खालील ४ गटात करण्यात यावी.**

| अ.क्र. | बिंदुंची विभागणी | वेतनगट १ ते ४ सरळ सेवेकरीता निश्चित बिंदु | वेतनगट १ ते ४ पदोन्नती करीता निश्चित बिंदु |
|---|---|---|---|
| १. | गट - १ बिंदु क्र. १ ते २५ | १ | १ |
| २. | गट - २ बिंदु क्र. २६ ते ५० | २६ | २६ |
| ३. | गट - ३ बिंदु क्र. ५१ ते ७५ | ५१ | ५१ |
| ४. | गट - ४ बिंदु क्र. ७६ ते १०० | ७६ | ७६ |

**क.** बिंदू क्रमांक १, २६, ५१, ७६ दिव्यांगासाठी निश्चित करण्यात येत असून, त्यावर दिव्यांगाच्या प्रकारानुसार त्यांच्यासाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर दिव्यांग व्यक्तीच्या क्रमांकावर त्यांच्या प्रवर्गानुसार त्यांचा बिंदू निश्चित होत असेल तेथे त्यांचा समावेश करण्यात यावा. एखाद्या पदासाठी दिव्यांगाचा कोणताही एकच प्रकार सुनिश्चित असल्यास गट १ मधील बिंदू पासून सुरूवात करावी. एकापेक्षा जास्त प्रकारातील पदे सुनिश्चित असल्यास १) अंध/अल्पदृष्टी २) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता ३) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्टरोग मुक्त (Leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid attack victims)/ स्नायु विकृती (Muscular dystrophy) ४) स्वमग्नता (Autism) मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific learning disability)/ मानसिक आजार (Mental illness) ५) वरील १ ते ४ मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यांसाठी या क्रमाने आळीपाळीने आरक्षित राहील याची खातरजमा करावी.

**ख.** जरी बिंदू क्रमांक १, २६, ५१, ७६ दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असले तरी उक्त बिंदूवर त्यांचा समावेश होत नसल्यास त्यांच्यासाठी आरक्षित गटातच त्यांना दर्शविण्याची दक्षता घ्यावी. एखाद्या वेळी गट १ मधील १ ते २५ बिंदू वर काही कारणास्तव उमेदवाराचा समावेश करणे शक्य होत नसल्यास गट २ मधील दोन बिंदुंचा सुयोग्य वापर करण्यात यावा. म्हणजेच एका गटात बिंदू राखीव ठेवणे काही कारणास्तव शक्य न झाल्यास तो पुढीलगटात समावेश करणे आवश्यक राहील. १०० बिंदू नामावली पूर्ण झाल्यास पुन्हा पहिल्या बिंदूपासून गणना सुरु करावी. बिंदू नामावलीचा नमुना "प्रपत्र अ" सोबत देण्यात आला आहे.

**ग.** रिक्त असलेल्या पदांवर पदोन्नतीसाठी जेवढया पदांची निवडसूची तयार करावयाची आहे तेवढया १०० टक्के पदांसाठी निवडसूची तयार करावी. सदर निवडसूची तयार करताना दिव्यांग आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी संदर्भाधिन शासन निर्णयात विहित करण्यात आलेल्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी. मात्र सद्य:स्थितीत पदोन्नती देतांना दिव्यांग नसलेल्या अधिकाऱ्यांना ५० टक्के पदांवर पदोन्नती दयावी व त्या व्यतिरिक्त दिव्यांगाकरीता पदोन्तीसाठी लागू केलेल्या ४ टक्के आरक्षणानुसार निवडसूचीतील पात्र दिव्यांग अधिकाऱ्यांना सद्य:स्थितीतील एकूण रिक्त पदांपैकी उर्वरित ५०% रिक्त पदांवर पदोन्नती देण्यात यावी.

**८. दिव्यांगांसाठी आरक्षित पदे पुढील भरती वर्षात ओढणे व अंतर्गत परिवर्तनाने पदभरती करणे :-**

(१) एखादया भरतीवर्षात विहीत दिव्यांगत्व असलेली पात्र दिव्यांग व्यक्ती उपलब्ध झाली नाहीतर त्या दिव्यांगाच्या प्रकारासाठी आरक्षित जागेचा अनुशेष पुढील भरती वर्षासाठी पुढे ओढण्यात यावा. ती जागा इतर कोणत्याही उमेदवारांमधून भरण्यात येऊ नये. जर पुढील भरती वर्षातही विशिष्ट दिव्यांग प्रकारासाठी आरक्षित पदासाठी पात्र उमेदवार उपलब्ध झाला नाही तर अन्य दिव्यांग प्रकारातून अंतर्गत परिवर्तनाने पद भरती करावी. अंतर्गत परिवर्तनातून पद भदती करण्यात आल्यास आरक्षणाने पद भरण्यात आले असे समजावे. अंतर्गत परिवर्तनानेही सदर पद भरणे शक्य न झाल्यास सदर पद दिव्यांगा व्यतिरिक्त इतर उमेदवारांमधून भरण्यात यावे. वरीलप्रमाणे इतर पर्याय उपयोगात आणण्यासाठी पद भरतीची जाहिरात देतांना मागील वर्षातील अनुशेषाची पदे भरतांना सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनाने पद भरती करण्यात येईल व तेही शक्य न झाल्यास सदर पद दिव्यांगा व्यतिरीक्त इतर उमेदवारांमधून भरण्यात येईल असे स्पष्टपणे नमूद करावे.

(२) प्रत्येक भरती वर्षात दिव्यांगांसाठी विहित आरक्षणानुसार पद भरतीमध्ये आरक्षण ठेवावे. असे करताना मागील भरती वर्षातील अनुशेषाच्या जागा प्रथम भरण्यात याव्यात व चालू भरती वर्षाच्या जागा भरणे शक्य नसल्यास पुढे ओढण्यात येतील याबाबतचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करावा.

९. **दिव्यांग व्यक्तींचा समावेश:-** दिव्यांग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेले आरक्षण हे समांतर आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे सामाजिक व खुला या दोन्ही भागात विभक्त होणारे आरक्षण आहे. परंतू दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदे खुला किंवा सामाजिक आरक्षण प्रवर्गात दर्शविण्यात येत नाहीत. दिव्यांगासाठी राखीव पदे वेगळी दर्शविण्यात येतात. दिव्यांगासाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातून करण्यात येतो. जसे अनुसूचित जाती किंवा जमातीचा असल्यास त्यासाठी विहित केलेल्या बिंदूवर समाविष्ट करावे तसेच अनुसूचित जमातीच्या उमेदवार असल्यास त्यासाठी विहीत केलेल्या बिंदूवर त्याच्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या बिंदूवर व उमेदवार खुला असल्यास खुल्याच्या बिंदूवर दर्शविण्यात यावा. परंतू जेव्हा सामाजिक आरक्षण प्रवर्गातील अथवा खुला प्रवर्गातील एखाद्या उमेदवाराची निवड झाल्यास व त्या प्रवर्गाच्या बिंदू रिक्त नसल्यास भविष्यात त्याच्या प्रवर्गाच्या रिक्त होणाऱ्या बिंदूवर त्याचा समावेश करण्यात यावा. अन्य बिंदूवर त्याचा समावेश करण्यात येवू नये.

१०. **पात्र दिव्यांग उमेदवार उपलब्ध होत नसल्यास निकषात सुट देणे :-** दिव्यांगांसाठी आरक्षित जागेसाठी पात्र उमेदवार मिळत नसल्यास दिव्यांग आरक्षण प्रवर्गातील उमेदवारांना विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीमध्ये सुट देता येईल. परंतू असे करताना विहित अपंगात्वाच्या प्रमाणात कोणतीही सुट देता येणार नाही. सुट देण्यात आलेल्या अटी व शर्तीचा लाभ खुला व सामाजिक आरक्षण प्रवर्गातील सर्व उमेदवारांना एकसारखा देण्यात यावा.

११. **मागणीपत्र सादर करतांना निवड प्राधिकरणास सादर करावयाचे प्रमाणपत्र :-** दिव्यांग अधिनियमातील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करून पद भरती करण्यात यावी. यासाठी सोबत जोडलेल्या "प्रपत्र ब" मध्ये विहित नमुन्यात मागणीपत्र सादर करताना सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणीत करावे. तसेच प्रथम नियुक्तीच्या वेळी नियुक्ती प्राधिकारी यांनी संबंधित उमेदवार दिव्यांगासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीत अपंगत्व असल्याची खात्री करून आरक्षणाचा लाभ घेण्यास पात्र असल्याचीही खातरजमा करील.

१२. दिव्यांग हक्क अधिनियम, २०१६ मध्ये राज्य शासनास पदोन्नतीमध्ये आरक्षणाबाबतचे अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यानुसार राज्य शासनाने दिव्यांगांना दि. ०५.०३.२००२ च्या शासन निर्णयान्वये वेतनगट ३ व ४ च्या पदावर पदोन्नतीसाठी आरक्षण दिलेले आहे. **शासनाच्या धर्तीवर दिव्यांगांना वेतनगट ३ व ४ च्या पदावर पदोन्नतीसाठी आरक्षण लागू राहील तसेच दि.१४.०७.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये वेतनगट १ व २ मधील पदांकरीता पदोन्नतीसाठी दिव्यांग प्रवर्गातील आरक्षण लागू राहील.**

*****

(म.रा.वि.वि.कं.मर्या., वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम-२००५ चे सुधारपत्र क्र. ८७ दि.०१/०८/१९ सोबतचे सहपत्र)

**प्रपत्र - 'अ'**

## दिव्यांग अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार दिव्यांगाच्या सरळसेवा / पदोन्नतीची माहिती ठेवण्यासाठी बिंदूनामावलीचा विहित नमुना

| भरती वर्ष | पदाचे नाव | रोटेशन (चक्री) क्रमांक | बिंदू क्रमांक | दिव्यांगाच्या खालील विविध प्रकारांपैकी विहित दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तीसाठी सुनिश्चीत करण्यात आलेले आहे काय | | | | आरक्षित किंवा अनारक्षित (आरक्षित असल्यास ज्या सुनिश्चित प्रकारासाठी आरक्षित असेल तो गट नमूद करावा) | ज्या व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली त्याचे नाव व नियुक्तीचा दिनांक | नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा अ, ब, क, (ड व इ) मधील प्रकार | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | (ड व इ) | | | | |

(म.रा.वि.वि.कं.मर्या., वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम-२००५ चे सुधारपत्र क्र. ८७ दि.०१/०८/१९ सोबतचे सहपत्र)

**प्रपत्र - 'ब'**

## मागणीपत्रासोबत सादर करण्याचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, दिव्यांग अधिनियम २०१६ जो दिनांक १९/०४/२०१८ रोजी अंमलात आलेला आहे. त्यामधील तरतुदीनुसार दिव्यांग व्यक्तीसाठी विहित करण्यात आलेल्या आरक्षणाच्या काटेकोर अंमलबजावणीची काळजी घेवून हे मागणीपत्र पाठविण्यात येत आहे. सोबतच्या मागणीपत्रात देण्यात आलेली रिक्त पदे हे बिंदू क्रमांक ---- वरील चक्री (रोटेशन) क्रमांक --- मधील १०० बिंदूनामावलीतील रोस्टरमधील --- इतकी रिक्त पदे विहित दिव्यांग असलेल्या व्यक्तीसाठी आरक्षित आहेत.

**सक्षम नियुक्ती प्राधिकारी**

**दिव्यांग अधिनियम २०१६ अनुसार शासन सेवेतील पदांवर शारीरिकदृष्टया दिव्यांग व्यक्तींसाठी ४ टक्के आरक्षण विहित करणे व आरक्षण अमंलबजावणीची कार्यपध्दती......**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादामकामा रोड
दिनांक - २९ मे, २०१९

**वाचा** :- (१) शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०७७/३५७६/१४३३/१६-अ, दिनांक २३ मे,१९७८
(२) शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०८१/प्र.क्र.१५/९९/१६-अ, दिनांक ७ सप्टेंबर, १९८२
(३) शासन निर्णय समाजकल्याण, संसकृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक इडीडी १०९० २२५९२/सिआर ४००/सुधार-२, दिनांक १९ ऑगस्ट, १९९२
(४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-१०९७/सीआर-२/९७/१६-ब, दिनांक १६ ऑगस्ट, १९९७
(५) शासन परिपक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र. क्र. १२/९७/१६-अ दिनांक ०२ मे, १९९८
(६) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक न्याय-२००७/प्र.क्र.१०३८(भाग ३)/१६-अ, दिनांक १९ ऑक्टोबर, २००७
(७) दिव्यांगांचे अधिकार अधिनियम २०१६, दिनांक २८ डिसेंबर, २०१६
(८) केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाची दिनांक १५ जून, २०१७ ची अधिसूचना
(९) केंद्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाचे कार्यालयीन आदेश क्रमांक ३६०३५/०२/२०१७ (आस्था), दिनांक १५ जानेवारी, २०१८

**प्रस्तावना:-**

केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती ( समान संधी संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ च्या कलम ३२ व ३३ मधील तरतुदीनुसार अपंग व्यक्तींना शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी गट अ ते ड मधील पदावर नियुक्तीसाठी ३% आरक्षण दिनांक २ मे, १९९८ च्या परिपत्रकान्वये विहित करण्यात आलेले आहे. तसेच केंद्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाने दिनांक २०.११.१९८९ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये अपंगासाठी गट क व ड च्या सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर पदोन्नतीसाठी ३% आरक्षण लागू करण्यात आले होते. केंद्र शासनाने दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६ पारित केला असून अपंग व्यक्ती ( समान संधी संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ व्यपगत झाला आहे. दिनांक १५.६.२०१७ रोजीच्या अधिसूचनेव्दारे दिव्यांग व्यक्तींचे अधिकार अधिनियम, २०१६ अंमलात आणलेले आहे. केंद्र शासनाने दिनांक १५/०१/२०१८ च्या कार्यालयीन आदेशान्वये दिव्यांगाच्या १) अंध/अल्पदृष्टी २) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता ३) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (acid attack victims)/ स्नायुविकृती (muscular dystrophy) ४) स्वमग्नता (Autism)/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disability)/मानसिक आजार (mental illness) ५) वरील १ ते ४ मधील बहिरेपणा व अंधत्वासह

एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणारे अशा विविध ५ प्रकारांसाठी ४ % आरक्षण विहित केलेले आहे.

मंत्रिमंडळाने दिव्यांग व्यक्तींसाठींच्या महाराष्ट्र राज्य धोरणास मान्यता दिली असून त्यामध्ये दिव्यांग व्यक्ती अधिकार कायदा २०१६ अनुसार दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या सेवेतील आरक्षणाचा समावेश आहे. त्यानुसार शासन प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

१. दिव्यांग अधिनियम २०१६ मधील तरतुदींनुसार विहित प्रमाणात दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तींना पद आणि सेवेमध्ये आरक्षणासंदर्भात कलम २ (r) मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे, दिव्यांग व्यक्तींसाठी शासन सेवेत प्रवेशासाठी दिव्यांगांच्या खाली नमूद करण्यात आलेल्या पाच गटापैकी गट अ, ब, क साठी प्रत्येकी १% तसेच गट ड व इ साठी १% या प्रमाणे ४% आरक्षण विहित करण्यात येत आहे. सरळसेवा भरतीमध्ये विहित दिव्यांगत्व असणाऱ्या सर्व संवर्गासाठी रिक्त पदाच्या ४% पदे दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित ठेवण्यात यावीत.

अ) अंध /अल्पदृष्टी

ब) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता

क) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (acid attack victims)/ स्नायु विकृती (muscular dystrophy)

ड) स्वमग्नता (Autism)/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disability)/मानसिक आजार (mental illness)

इ) वरील अ ते ड मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यासाठी त्यांचेसाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर

२. **पदांची गणना** :- गट क व गट ड मधील पदांची गणना करतांना, त्या भरती वर्षातील त्या त्या गटातील सर्व संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या संख्येवर निश्चित करावी. असे करतांना त्या त्या गटातील दिव्यांगासाठी एकाच आस्थापनेतील सुनिश्चित करण्यात आलेल्या संवर्गातील रिक्त पदे व सुनिश्चित न करण्यात आलेल्या संवर्गातील रिक्त पदे विचारात घेण्यात यावीत. परंतु जेव्हा सुनिश्चित न करण्यात आलेल्या संवर्गातील पदांची संख्या मोठी राहील अशा वेळी ज्या संवर्गाची पद संख्या व रिक्त पदे कमी आहेत असा संवर्ग आरक्षणाची पदे निश्चित करण्यासाठी विचारात घ्यावा. गट क संवर्गातील तीन विविध पदनाम असलेल्या पदावर पदभरती करावयाची असल्यास त्यातील एक पद अपंगासाठी सुनिश्चित नसल्यास उक्त पदातील रिक्त पदावरील

आरक्षणाची ४% पदे अन्य दोन संवर्गात घेण्यात यावीत.उदाहरणार्थ लिपिक, वरिष्ठ लिपिक व वनपाल अशी तीन पदावर पद भरती करतांना वनपाल पद सुनिश्चित नसल्यास, वनपाल या संवर्गाची रिक्त पदाची संख्या अन्य दोन संवर्गापेक्षा मोठी असल्यास उर्वरित दोन संवर्गातील ज्या पदाची रिक्त पदाची संख्या कमी असेल त्या संवर्गाची पदे दिव्यांग आरक्षणाची पदे निश्चित करण्यासाठी विचारात घेण्यात यावी. असे करत असताना विहित आरक्षणाचे प्रमाण ओलांडले जाईल. भरतीसाठी ७ रिक्त पदे उपलब्ध होत असल्यास त्यातील १ पद दिव्यांगासाठी आरक्षित करावे. ७ पेक्षा जास्त पदे भरतीसाठी उपलब्ध होत असल्यास विहित आरक्षणाप्रमाणे पद गणना करावी.

विहित दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तींसाठी गट “अ” व “ब” च्या सरळसेवेच्या कोट्यातील पदासाठी आरक्षणाची पदे निश्चित करतांना त्या-त्या संवर्गासाठी विहित केलेल्या प्रमाणात रिक्त पदावर गणना करण्यात यावी.

तसेच एखाद्या संवर्गात / गटात दिव्यांगत्वाच्या सर्व प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली असली किंवा कमी प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली असली तरी जेवढ्या प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली आहेत त्यासाठीचे एकूण आरक्षण ४ % एवढेच (सरळ सेवेच्या कोट्यातील पदांवर) राहील. कमी प्रकारासाठी पदे सुनिश्चित केली म्हणून आरक्षणाचे एकूण प्रमाण कमी करण्यात येणार नाही.

३. **पद सुनिश्चितीकरणास अपवाद :-** उपरोक्त तरतुदीनुसार एखादया विभागातील पद आरक्षित करणे शक्य होणार नसल्यास याबाबतीत सूट देण्याबाबतच्या तरतुदी दिव्यांग अधिनियमाच्या कलम ३४ मध्ये नमूद केलेल्या आहेत. त्यानुसार एखाद्या शासकीय विभागास वा आस्थापनेस अथवा संवर्गास त्या पदाच्या कामाचे स्वरुप व जबाबदाऱ्या विचारात घेऊन दिव्यांग व्यक्तीसाठी पद (सुनिश्चितीकरणातून) आरक्षणातून आस्थापनेवरील सर्व संवर्गासाठी किंवा काही संवर्गासाठी सूट घ्यावयाची असल्यास तसा प्रस्ताव संपूर्ण समर्थनासह व अपंग आयुक्त यांच्या शिफारशींसह संबंधीत प्रशासकीय विभागाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या सहमतीने संयुक्तिक आदेश निर्गमित करावेत. तसेच यापूर्वी अपवाद करण्यात आलेल्या संवर्गासाठी / पदांसाठी पुन:श्च मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

४. **अनारक्षित पदावर दिव्यांग व्यक्तींची नियुक्ती :-** दिव्यांगासाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर दिव्यांग व्यक्तीस गुणवत्तेच्या आधारावर निवडीस पात्र ठरत असल्यास व त्यांचेसाठी पद आरक्षित नसले तरी नियुक्तीसाठी अपात्र ठरविता येणार नाही. जर दिव्यांग उमेदवारांची इतर उमेदवारांप्रमाणेच व प्रचलित नियमाप्रमाणे दिव्यांग उमेदवारांना देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ न घेता एखाद्या पदावर निवड झाली असेल अशा उमेदवारांची गणना दिव्यांगासाठी आरक्षित जागेवर करण्यात येऊ नये व दिव्यांगासाठी आरक्षित पदे / पद इतर दिव्यांग उमेदवारांमधून भरण्यात यावीत.

५. **दिव्यांगाचे प्रमाणपत्र** - दिव्यांगाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या व्यक्तीने सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. निवड प्रक्रीये दरम्यान अथवा नियुक्तीच्या दरम्यान उक्त

प्रमाणपत्राची तपासणी / फेरतपासणी करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्याला राहतील. दिव्यांगाचे प्रमाणपत्र बाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक १४.०९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अनुसार दिव्यांगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

६. **वयोमर्यादा :-** दिव्यांग व्यक्तीसाठी शासन सेवा प्रवेशासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १६ जून २००१ या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेली कमाल वयोमर्यादा कायम ठेवण्यात येत असून ती वय वर्षे ४५ इतकीच राहील.

७. **बिंदूनामावली (रोस्टर) राखणे** :- प्रत्येक शासकीय कार्यालयाने त्यांच्या आस्थापनेवरील प्रत्येक संवर्गासाठी दिव्यांग व्यक्ती सरळ सेवा भरतीच्या पदासाठी १०० बिंदू नामावलीची स्वतंत्र नोंदवही ठेवावी. यापूर्वी ३ % आरक्षणाप्रमाणे दिव्यांग व्यक्तीसाठी बिंदू नामावलीतील बिंदू क्रमांक १, ३४ व ६७ निश्चित करण्यात आले होते. परंतु आता दिव्यांगाच्या ४ वर्गवारी असल्याने व बिंदूनामावली राखण्यास सुसूत्रता यावी म्हणून बिंदू क्रमांक १, २६, ५१ व ७६ बिंदू निश्चित करण्यात येत आहेत.

वरील बिंदूंची विभागणी खालील ४ गटात करण्यात यावी.

| | |
|---|---|
| गट १ बिंदू क्रमांक | १ ते २५ |
| गट २ बिंदू क्रमांक | २६ ते ५० |
| गट ३ बिंदू क्रमांक | ५१ ते ७५ |
| गट ४ बिंदू क्रमांक | ७६ ते १०० |

बिंदू क्रमांक १, २६, ५१, ७६ दिव्यांगासाठी निश्चित करण्यात येत असून, त्यावर दिव्यांगाच्या प्रकारानुसार त्यांच्यासाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर दिव्यांग व्यक्तीच्या क्रमांकावर त्यांच्या प्रवर्गानुसार त्यांचा बिंदू निश्चित होत असेल तेथे त्यांचा समावेश करण्यात यावा. एखाद्या पदासाठी दिव्यांगाचा कोणताही एकच प्रकार सुनिश्चित असल्यास गट १ मधील बिंदू पासून सुरूवात करावी. एकापेक्षा जास्त प्रकारातील पदे सुनिश्चित असल्यास १) अंध/अल्पदृष्टी २) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता ३) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (acid attack victims)/ स्नायुविकृती (muscular dystrophy) ४) स्वमग्नता (Autism)/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disability)/मानसिक आजार (mental illness) ५) वरील १ ते ४ मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यांसाठी या क्रमाने आळीपाळीने आरक्षित राहील याची खातरजमा करावी.

जरी बिंदू क्रमांक १,२६,५१,७६ दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असले तरी उक्त बिंदूवर त्यांचा समावेश होत नसल्यास त्यांच्यासाठी आरक्षित गटातच त्यांना दर्शविण्याची दक्षता संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांनी घ्यावी. एखाद्या वेळी गट १ मधील १ ते २५ बिंदू वर काही कारणास्तव उमेदवाराचा

समावेश करणे शक्य होत नसल्यास गट २ मधील दोन बिंदूंचा सुयोग्य वापर करण्यात यावा. म्हणजेच एका गटात बिंदू राखीव ठेवणे काही कारणास्तव शक्य न झाल्यास तो पुढील गटात समावेश करणे आवश्यक राहील. १०० बिंदू नामावली पूर्ण झाल्यास पुन्हा पहिल्या बिंदूपासून गणना सुरु करावी. बिंदू नामावलीचा नमुना “प्रपत्र अ” सोबत देण्यात आला आहे.

**८. दिव्यांगांसाठी आरक्षित पदे पुढील भरती वर्षात ओढणे व अंतर्गत परिवर्तनाने पदभरती करणे** :-

(१) एखादया भरतीवर्षात विहीत दिव्यांगत्व असलेली पात्र दिव्यांग व्यक्ती उपलब्ध झाली नाही तर त्या दिव्यांगाच्या प्रकारासाठी आरक्षित जागेचा अनुशेष पुढील भरती वर्षासाठी पुढे ओढण्यात यावा. ती जागा इतर कोणत्याही उमेदवारांमधून भरण्यात येऊ नये. जर पुढील भरती वर्षातही विशिष्ट दिव्यांग प्रकारासाठी आरक्षित पदासाठी पात्र उमेदवार उपलब्ध झाला नाही तर अन्य दिव्यांग प्रकारातून अंतर्गत परिवर्तनाने पद भरती करावी. अंतर्गत परिवर्तनातून पद भरती करण्यात आल्यास आरक्षणाने पद भरण्यात आले असे समजावे. अंतर्गत परिवर्तनानेही सदर पद भरणे शक्य न झाल्यास सदर पद दिव्यांगा व्यतिरिक्त इतर उमेदवारांमधून भरण्यात यावे. वरीलप्रमाणे इतर पर्याय उपयोगात आणण्यासाठी पद भरतीची जाहिरात देतांना मागील वर्षातील अनुशेषाची पदे भरतांना सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनाने पद भरती करण्यात येईल व तेही शक्य न झाल्यास सदर पद दिव्यांगा व्यतिरिक्त इतर उमेदवारांमधून भरण्यात येईल असे स्पष्टपणे नमूद करावे.

(२) प्रत्येक भरती वर्षात दिव्यांगांसाठी विहित आरक्षणानुसार पद भरतीमध्ये आरक्षण ठेवावे. असे करताना मागील भरती वर्षातील अनुशेषाच्या जागा प्रथम भरण्यात याव्यात व चालू भरती वर्षाच्या जागा भरणे शक्य नसल्यास पुढे ओढण्यात येतील याबाबतचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करावा.

९. **दिव्यांग व्यक्तींचा समावेश** :- दिव्यांग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेले आरक्षण हे समांतर आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे सामाजिक व खुला या दोन्ही भागात विभक्त होणारे आरक्षण आहे. परंतु दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदे खुला किंवा सामाजिक आरक्षण प्रवर्गात दर्शविण्यात येत नाहीत. दिव्यांगासाठी राखीव पदे वेगळी दर्शविण्यात येतात. दिव्यांगासाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातून करण्यात येतो. जसे अनुसूचित जाती किंवा जमातीचा असल्यास त्यासाठी विहित केलेल्या बिंदूवर समाविष्ठ करावे तसेच अनुसूचित जमातीचा उमेदवार असल्यास त्यासाठी विहीत केलेल्या बिंदूवर त्याच्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या बिंदूवर व उमेदवार खुला असल्यास खुल्याच्या बिंदूवर दर्शविण्यात यावा. परंतू जेव्हा सामाजिक आरक्षण प्रवर्गातील अथवा खुला प्रवर्गातील एखाद्या उमेदवाराची निवड झाल्यास व त्या प्रवर्गाचा बिंदू रिक्त नसल्यास भविष्यात त्याच्या प्रवर्गाच्या रिक्त होणाऱ्या बिंदूवर त्याचा समावेश करण्यात यावा. अन्य बिंदूवर त्याचा समावेश करण्यात येवू नये.

**१०. पात्र दिव्यांग उमेदवार उपलब्ध होत नसल्यास निकषात सुट देणे :-** दिव्यांगासाठी आरक्षित जागेसाठी पात्र उमेदवार मिळत नसल्यास दिव्यांग आरक्षण प्रवर्गातील उमेदवारांना विहित करण्यात

आलेल्या अटी व शर्तीमध्ये सुट देऊन करता येईल. परंतु असे करताना विहित अपंगत्वाच्या प्रमाणात कोणतीही सुट देता येणार नाही. सुट देण्यात आलेल्या अटी व शर्तीचा लाभ खुला व सामाजिक आरक्षण प्रवर्गातील सर्व उमेदवारांना एकसारखा देण्यात यावा.

**११. मागणीपत्र सादर करतांना निवड प्राधिकरणास सादर करावयाचे प्रमाणपत्र :-** दिव्यांग अधिनियमातील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करून पद भरती करण्यात यावी. यासाठी सोबत जोडलेल्या "प्रपत्र ब" मध्ये विहित नमुन्यात मागणीपत्र सादर करताना सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणीत करावे. तसेच प्रथम नियुक्तीच्या वेळी नियुक्ती प्राधिकारी यांनी संबंधित उमेदवार दिव्यांगासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीत अपंगत्व असल्याची खात्री करून आरक्षणाचा लाभ घेण्यास पात्र असल्याचीही खातरजमा करील.

१२. केंद्र शासनाने दि. १५.०१.२०१८ च्या कार्यालयीन आदेशात दिव्यांगांसाठी पदोन्नतीमध्ये आरक्षणाची तरतूद ठेवलेली नाही. परंतु दिव्यांग हक्क अधिनियम, २०१६ मध्ये संबंधित राज्य शासनास पदोन्नतीमध्ये आरक्षणाबाबतचे अधिकार देण्यात आलेले आहेत. राज्य शासन नेहमीच केंद्र शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी करत आले आहे. केंद्र शासनाने सन १९९८ मध्ये दिव्यांगांना गट क व ड च्या पदावर पदोन्नतीसाठी आरक्षण दिले होते. राज्य शासनाने त्याची अंमलबजावणी दिनांक ५/०३/२००२ च्या शासन निर्णयान्वये केली आहे. तेव्हा गट क व ड च्या दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी उक्त तरतूद जशीच्या तशी सुरू राहतील. गट अ व ब च्या पदावरील पदोन्नतीसाठी आरक्षण विहित करण्याचा निर्णय केंद्र शासनाच्या निर्णयानंतर यथावकाश घेण्यात येईल.

हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवा, शासनाचे उपक्रम, महामंडळे, मंडळे, शासन अनुदानित संस्था व ज्यांना मार्गदर्शक सूचना देण्याचा अधिकार शासनास आहे अशा सर्व संस्था व सेवा यामधील नियुक्त्यांसाठी लागू राहतील.

सदर शासन निर्णय महारष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५२८१४४२२८४९०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, serialNumber=9395c596b57a69fe04109b8c8191e7389cff5eda3fac16c6f8263be7fbbd319d, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2019.05.29 14:59:30 +05'30'

**( टि.वा.करपते )**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२

२. मा. सर्व सन्माननिय विधानसभा/ विधानपरिषद,व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
३. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई- ३२
४. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
६. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई-४०० ०३२.
७. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई-४०० ०३२.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
११. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१२. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१५. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८. उप सचिव (आस्थापना शाखा), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुबई-३२
१९. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२०. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२१. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई- ४०० ०३२.
२२. सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई-४०० ०३२.
२३. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२४. सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२५. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२६. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२७. विधीमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई (१० प्रती),
२८. सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२९. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य,
३०. निवड नस्ती/कार्यासन १६-अ.

(सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दि. २८ मे, २०१९ सोबतचे सहपत्र)

**प्रपत्र अ**

दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार दिव्यांगाच्या पद भरतीची माहिती ठेवण्यासाठी

बिंदूनामावलीचा विहित नमुना

| भरती वर्ष | पदाचे नाव | रोटेशन क्रमांक | बिंदू क्रमांक | दिव्यांगाच्या खालील विविध प्रकारांपैकी विहित दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तीसाठी सुनिश्चित करण्यात आलेले आहे काय | | | | आरक्षित किंवा अनारक्षित (आरक्षित असल्यास ज्या सुनिश्चित प्रकारासाठी आरक्षित असेल तो गट नमूद करावा) | ज्या व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली त्याचे नाव व नियुक्तीचा दिनांक | नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा अ, ब, क, (ड व इ) मधील प्रकार | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | (ड व इ) | | | | |

(सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दि. २८ मे, २०१९ सोबतचे सहपत्र)

**प्रपत्र - ब**

**मागणीपत्रासोबत सादर करण्याचे प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, दिव्यांग अधिनियम २०१६ जो दिनांक १९/०४/२०१८ रोजी अंमलात आलेला आहे. त्यामधील तरतुदीनुसार दिव्यांग व्यक्तीसाठी विहित करण्यात आलेल्या आरक्षणाच्या काटेकोर अंमलबजावणीची काळजी घेवून हे मागणीपत्र पाठविण्यात येत आहे. सोबतच्या मागणीपत्रात देण्यात आलेली रिक्त पदे हे बिंदू क्रमांक --- वरील चक्री क्रमांक --- मधील १०० बिंदूनामावलीतील रोस्टरमधील ----- इतकी रिक्त पदे विहित दिव्यांग असलेल्या व्यक्तीसाठी आरक्षित आहे.

सक्षम नियुक्ती प्राधिकारी

न्यायालयीन प्रकरण
अत्यंत तातडीचे

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६-अ
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय विस्तार इमारत,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १४ जुलै, २०२१

प्रति,
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.

**विषय: दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट अ व गट ब मधील पदांवर पदोन्नती मधील आरक्षणाबाबत**
**संदर्भ : सा.प्र.वि., शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६ अ, दि.०५.०७.२०२१**

सामान्य प्रशासन विभागाच्यासंदर्भाधीन शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अनुसार दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट अ व गट ब मधील पदांवर पदोन्नती मध्ये आरक्षण विहित करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर आदेशान्वये शासन सेवेतील गट-अ व गट ब मधील पदांवर नियुक्तीस पात्र (Identified Posts) ठरविलेल्या पदांवर पदोन्नतीमध्ये४ टक्के आरक्षण देण्याबाबत सूचना देण्यात आल्याआहेत. त्यानुसार दिव्यांग प्रकारातील नमूद करण्यात आलेल्या अ, ब आणिक दिव्यांग प्रकारासाठी प्रत्येकी एक टक्के आरक्षण तसेच ड व इ या प्रकारासाठी एक टक्के याप्रमाणे एकूण ४ टक्के आरक्षण देण्यात आलेलेआहे. सदर आदेश मंत्रालयीन विभागवत्यांच्या अखत्यारीतील सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालय मंडळे, महामंडळे प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद,महानगरपालिका, नगरपालिका , शासन अनुदानित संस्था आणि ज्यांना आदेश देण्याचा अधिकार शासनास आहे अशा सर्व संस्था व सेवा यांना हे आदेश लागू आहेत.

उक्त आदेशानुसार ज्या ज्या संवर्गातील पदे दिव्यांगासाठी सुनिश्चित करण्यात आलेले आहेत, त्या पदांवर पदोन्नती देण्यासाठी प्रशासकिय विभागांनी व त्यांच्या अखत्यारितील कार्यालयानी त्वरीत कार्यवाही करणे अपेक्षित आहे. तसेच सदरची कार्यवाही करताना मा. उच्च न्यायालयाचे दिनांक २९.०६.२०२१ व दि.०८.०७.२०२१ रोजीचे आदेश विचारात घ्यावयाचे आहेत. त्यामुळे रिक्त असलेल्या पदांवर पदोन्नतीसाठी जेवढया पदांची निवडसूची तयार करावयाची आहे तेवढया १०० टक्के पदांसाठी निवडसूची तयार करावी. सदर निवडसूची तयार करताना दिव्यांग आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी संदर्भाधिन शासन निर्णयात विहित करण्यात आलेल्या तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी. मात्र सद्य:स्थितीत पदोन्नती देतांना दिव्यांग नसलेल्या अधिकाऱ्यांना ५० टक्के पदांवर पदोन्नती दयावी व त्या व्यतिरिक्त दिव्यांगाकरीता पदोन्नतीसाठी लागू केलेल्या ४ टक्के आरक्षणानुसार निवडसूचीतील पात्र दिव्यांग अधिकाऱ्यांना सद्य:स्थितीतील एकूण रिक्त पदांपैकी उर्वरित ५०% रिक्त पदांवर पदोन्नती देण्यात यावी.

निवडसूचीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी जे उमेदवार जुलै, २०२१ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत, परंतु त्या उमेदवारांना ५०% रिक्त पदांच्यामर्यादेत पदोन्नती देता येत नसल्यास अशा उमेदवारांना ५०% च्या मर्यादेतील शेवटचे उमेदवार वगळून त्या उमेदवारांना पदोन्नती देण्यात यावी.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेचसदरच्यासूचना सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनीत्यांच्या अखत्यारीतील कार्यालय यांच्यानिदर्शनास आणून देण्यातयाव्यात. मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार पदोन्नतीबाबतचा अहवाल सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अखत्यारीतील कार्यालयांच्या माहितीसह एकत्रित करुन सचिव (साविस) सामान्य प्रशासन विभाग यांना **दि.२०.०७.२०२१ पूर्वी** सादर करावा.

सदर शासन पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२१०७१४१५०६५४३९०७ असा आहे. हे शासन पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

आपला

SITARAM JANARDAN KUNTE

Digitally signed by SITARAM JANARDAN KUNTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9815c3f980028edcb4508e57abe4358049e7f22849abba46cc29adaf9ed9088f, pseudonym=742A553230A8F887226591AE50C137CBDD9B9D72, serialNumber=19E146BF1D34C1BF410061C664DB28C5068DEEBB4A5EF5BC572D50ECC3993F91, cn=SITARAM JANARDAN KUNTE
Date: 2021.07.14 15:22:59 +05'30'

**( सीताराम कुंटे )**

मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
३. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद/विधानसभा) विधानभवन, मुंबई
४. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई- ४०० ०३२.
५. सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई-४०० ०३२.
६. मा.प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळशाखा/अपील शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
७. मा.प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
८. मा. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
९. सरकारी वकील, उच्च न्यायालय (मूळ शाखा/अपील शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१०.सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
११.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
१२.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका, महाराष्ट्र राज्य.
१३.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१४.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१५.सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य.
१६.निवड नस्ती/कार्यासन १६-अ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट "अ" व गट "ब" मधील
पदांवर पदोन्नतीमध्ये आरक्षण विहित करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक - दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६-अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक - ५ जुलै, २०२१**

वाचा : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०९९/प्र.क्र.३७/९९/१६-अ, दिनांक ५ मार्च, २००२
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८ / प्र.क्र.११४ /१६-अ, दिनांक २९ मे, २०१९

प्रस्तावना-

राज्य शासनाकडून वाचा (२) येथील दिनांक २९.०५.२०१९ च्या शासन निर्णयान्वये दिव्यांग अधिनियम, २०१६ अनुसार शासन सेवेतील पदांवर शारीरिकदृष्ट्या दिव्यांग व्यक्तींसाठी ४% आरक्षण विहित केले आहे तसेच सदर आरक्षण अंमलबजावणीची कार्यपद्धती नमूद करण्यात आली आहे. त्यामध्ये गट-क व गट-ड च्या दिव्यांग कर्मचाऱ्यांना ४ % आरक्षणाप्रमाणे पदोन्नती देताना वाचा (१) येथील शासन निर्णय दिनांक ०५.०३.२००२ मधील कार्यपद्धतीचा वापर करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने राजीव कुमार गुप्ता व इतर यांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक ५२१/२००८ प्रकरणी शासन सेवेतील दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना गट "अ" व गट "ब" च्या पदावर पदोन्नती देण्याबाबत आरक्षण लागू करावे, असा निर्णय दिनांक ३०.०६.२०१६ रोजी दिला. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र. १५६७/२०१७ (सिद्दराजू वि. कर्नाटक राज्य) या प्रकरणी दि. १४.०१.२०२० रोजी अंतिम निर्णय दिला आहे. त्यामध्ये देखील राज्य शासकीय सेवेतील दिव्यांगांना गट-अ व गट-ब पदांवर पदोन्नतीमध्ये आरक्षणाबाबत मा.न्यायालयाकडून सकारात्मक भूमिका घेण्यात आली आहे.

दिव्यांगांना राज्य शासकीय सेवेत गट-अ व गट-ब च्या पदांवर पदोन्नतीमध्ये आरक्षण देणेसंदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ६८१९/२०२१ व इतर याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. सदर याचिकांवरील दि. २९.०६.२०२१ रोजी झालेल्या एकत्रित सुनावणीत मा. उच्च न्यायालयाने ज्या विभागातील पदांची दिव्यांगांसाठी सुनिश्चिती करण्यात आलेली आहे अशा पदांवरील पदोन्नतीस पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांची पदोन्नती करता येईल, मात्र त्यासोबतच पदोन्नतीचा दावा करणाऱ्या पात्र दिव्यांग कर्मचाऱ्यांनाही दिव्यांग अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार पदोन्नती देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी असे आदेश दिले आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे उक्त न्यायनिर्णय तसेच दिव्यांग हक्क अधिनियम, २०१६ मधील तरतुदींच्या अनुषंगाने राज्य शासकीय सेवेतील दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांना गट-अ व गट-ब मधील पदांवर पदोन्नतीमध्ये आरक्षण विहित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन निर्णय-

दिव्यांग अधिनियम २०१६ अनुसार दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट-अ व गट-ब मधील नियुक्तीस योग्य ठरविलेल्या पदांवर (Identified Posts) पदोन्नतीमध्ये ४ % आरक्षण देण्यासाठी खालील (अ) ते (इ) मधील दिव्यांग प्रकारांचा विचार करावा. खाली नमूद "अ", "ब" आणि "क" या दिव्यांग प्रकारांसाठी प्रत्येकी १ % आरक्षण तसेच "ड" व "इ" या प्रकारांसाठी १ % या प्रमाणे एकूण ४ % आरक्षण देण्यात यावे. पदोन्नतीमध्ये विहित दिव्यांगत्व असणाऱ्या सर्व संवर्गासाठी रिक्त पदाच्या ४ % पदे दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित ठेवण्यात यावीत.

अ) अंध / अल्पदृष्टी

ब) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता

क) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षाघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular dystrophy)

ड) स्वमग्नता (Autism) / मंदबुद्धी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific learning disability) / मानसिक आजार (Mental Illness)

इ) वरील अ ते ड मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यासाठी त्यांचेसाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदांवर.

२. ज्या पदावर दिव्यांगांना पदोन्नतीमध्ये आरक्षण द्यावयाचे आहे, ते पद सुनिश्चित (Identified Posts) असणे आवश्यक आहे.

३. विहित दिव्यांगत्व असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्याकरिता पदोन्नती कोट्यातील पदासाठी आरक्षणाची पदे निश्चित करताना त्या-त्या संवर्गासाठी विहित केलेल्या प्रमाणात रिक्त पदांवर गणना करण्यात यावी.

तसेच एखाद्या संवर्गात / गटात दिव्यांगत्वाच्या सर्व प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली असली किंवा कमी प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली असली तरी जेवढ्या प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली आहेत त्यासाठीचे एकूण आरक्षण ४ % एवढेच (पदोन्नतीच्या कोट्यातील पदांवर) राहील. कमी प्रकारासाठी पदे सुनिश्चित केली म्हणून आरक्षणाचे एकूण प्रमाण कमी करण्यात येणार नाही.

४. पदोन्नतीमध्ये ४ % आरक्षण देण्यासाठी १०० रिक्त पदांची नियुक्तीस योग्य ठरविलेल्या पदांची (Identified Posts) पदनिहाय स्वतंत्र नोंदवही ठेवावी. त्यामधील क्र. १, २६, ५१ व ७६ हे बिंदू दिव्यांगांसाठी आरक्षित करण्यात यावेत. विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी क्रमांक १ वर मूळ संवर्गातील (Feeder Cadre) कोणत्याही एका दिव्यांग प्रवर्गाच्या जेष्ठतम कर्मचाऱ्याचा प्रथम विचार करावा. म्हणजेच उदा. जर मूळ संवर्गामधील (Feeder Cadre) जेष्ठतम कर्मचारी अस्थिव्यंग प्रवर्गातील असेल तर नोंदवहीतील क्रमांक १ हा बिंदू त्याच्या पदोन्नतीकरिता वापरण्यात यावा. तथापि, दिव्यांगांच्या विविध प्रवर्गासाठी (उक्त "अ" ते "इ") योग्य प्रकारे आरक्षण आळीपाळीने राहील याची विभाग प्रमुखांनी खात्री करणे आवश्यक आहे. दिव्यांग कर्मचाऱ्यांस त्यांच्या दिव्यांग

प्रवर्गानुसार, त्यांना नोंदवहीत आरक्षित केलेल्या बिंदूनुसार पदोन्नती देताना त्यास त्याच्या सामाजिक आरक्षण/खुल्या प्रवर्गानुसार (उदा. अ.जा., अ.ज., खुला) बिंदूनामावली (Roster) मध्ये दर्शविण्यात यावे.

५. दिव्यांगांसाठी रिक्त असलेली पद / पदे पदोन्नतीने भरताना सुयोग्य दिव्यांग कर्मचाऱ्याचा दिव्यांग प्रवर्गानुसार आरक्षित पदाकरिता पदोन्नतीसाठी विचार करावा. मात्र जेथे संबंधित दिव्यांग प्रवर्गानुसार पुरेसे दिव्यांग कर्मचारी सर्वसाधारण पदोन्नती क्षेत्रात उपलब्ध नसतील, तेथे सर्वसाधारण पदोन्नती क्षेत्र ५ पट वाढवावे आणि त्यानुसार उपलब्ध होणाऱ्या दिव्यांग कर्मचाऱ्याचा विचार करावा. जर दिव्यांग प्रवर्गानुसार दिव्यांग कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र/उपलब्ध झाला नाही तर सदर रिक्त पद/पदे नियुक्तीस योग्य ठरविलेल्या (Identified Posts) अन्य दिव्यांग प्रवर्गात अदलाबदलीने बदलून दिव्यांग कर्मचाऱ्यांचा विचार करावा. परंतु दिव्यांग प्रवर्गानुसार दिव्यांग कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र/उपलब्ध झाला नाही, तर हे आरक्षण पुढील तीन भरती वर्षांकरिता पुढे ओढावे व नंतर व्यपगत करावे.

६. ज्या गट/संवर्गात सरळ सेवेने करावयाच्या नियुक्तीचे प्रमाण ७५% पेक्षा जास्त नसेल, अशाच गट/संवर्गामध्ये दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण राहील.

७. ज्या पदावर पदोन्नती द्यावयाची आहे त्या पदांच्या मूळ श्रेणीत (Feeder Grade), त्या दिव्यांग प्रवर्गातील व्यक्ती उपलब्ध असली पाहिजे,

८. पदोन्नतीसाठी कमीत कमी ७ पदे उपलब्ध असल्यास १ पद दिव्यांगांसाठी आरक्षित करण्यात यावे. तसेच ७ पेक्षा जास्त पदे पदोन्नतीसाठी उपलब्ध होत असल्यास ४ % विहित आरक्षणानुसार पदाची गणना करुन दिव्यांगांसाठी पदे निश्चित करण्यात यावीत.

९. ज्या अधिकारी / कर्मचारी यांची सर्वसाधारण (non-handicapped) घटकातून सेवेत नियुक्ती झाली असेल व सेवेत असतांना काही कालावधीनंतर अशा अधिकारी / कर्मचाऱ्यास दिव्यांगत्व आल्यास, विहित दिव्यांगत्वाचे वैध प्रमाणपत्र सादर केल्याच्या दिनांकापासून त्या व्यक्तीची सेवाज्येष्ठता दिव्यांग आरक्षणासाठी ग्राह्य धरण्यात यावी.

१०. एखाद्या दिव्यांग व्यक्तीची गुणवत्तेनुसार, दिव्यांग आरक्षणाचा लाभ न घेता निवड झाली असल्यास, विहित दिव्यांगत्वाचे वैध प्रमाणपत्र सादर केल्याच्या दिनांकापासून अशा व्यक्तीची सेवाज्येष्ठता दिव्यांगांच्या आरक्षणासाठी ग्राह्य धरण्यात यावी.

११. दिव्यांग कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीसाठी विचार करताना शासनाने वेळोवेळी केलेले पदोन्नती संबंधातील नियम, आदेश व निकष (उदा.पदोन्नतीलगतच्या पदावरील किमान सेवेचा कालावधी, विहित विभागीय/सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परिक्षा, गोपनीय अहवाल इ.) यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१२. सदर शासन निर्णय निर्गमित होणाऱ्या दिनांकापासून लागू राहील.

१३. सदर आदेश केंद्र शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात सिव्हिल अपील क्र. १५६७/२०१७ प्रकरणी दाखल केलेले संकीर्ण अर्ज क्र. २१७१/२०२० या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम

निर्णयानुसार केंद्र शासनाकडून निर्गमित करण्यात येणाऱ्या सूचनांच्या आणि मा. उच्च न्यायालयात प्रलंबित रिट याचिका क्र. ६८१९/२०२१ व इतर याचिका यांमध्ये होणाऱ्या अंतिम आदेशाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१४. हे आदेश राज्य शासकीय / निमशासकीय सेवा, शासनाचे उपक्रम, सर्व शासकीय मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका, शासन अनुदानित संस्था आणि ज्यांना आदेश देण्याचा अधिकार शासनास आहे अशा सर्व संस्था व सेवा यांना लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२१०७०५१६०३०३९४०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

TIKARAM WAMAN KARPATE

Digitally signed by TIKARAM WAMAN KARPATE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, cn=TIKARAM WAMAN KARPATE
Date: 2021.07.05 16:04:50 +05'30'

**( टि.वा.करपते )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई ४०० ०३२.
२. सर्व सन्माननीय विधानपरिषद/विधानसभा व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
३. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई- ४०० ०३५.
४. मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
५. मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई, ४०० ०३२.
६. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
८. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९. प्रधान सचिव (सामाजिक न्याय), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
११.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१२.सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१३.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद/विधानसभा) विधानभवन, मुंबई
१४.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई- ४०० ०३२.
१५.सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई-४०० ०३२.
१६.मा. प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ शाखा/अपील शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१७.मा.प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१८. मा. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.

१९.मा.महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई.
२०.मा.महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर.
२१.सरकारी वकील, उच्च न्यायालय (मूळ शाखा/अपील शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
२२.सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
२३.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
२४.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका, महाराष्ट्र राज्य.
२५.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
२६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई

**त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन निर्णय प्रसिध्द करण्यात यावा.**

२७.विधीमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई
२८. सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य.
२९.सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य.
३०.निवड नस्ती/कार्यासन १६-अ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई